# सोलापूर विद्यापीठ, सोलापूर
# व्यवस्थापन परिषद
# कार्यवृत्तांत
## शनिवार, दि. २१ नोव्हेंबर,२००९ दुपारी १:०० वा.

**व्यवस्थापन परिषदेची सभा शनिवार दि.२१/११/२००९ रोजी दुपारी १:०० वा.** व्यवस्थापन परिषद कक्षात मा. कुलगुरू महोदय यांचे अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आली होती.

सभेस खालीलप्रमाणे सदस्य उपस्थित होते.

| अ.क्र. | सदस्याचे नांव | पद |
|---|---|---|
| १) | मा. प्रा. डॉ. बी. पी. बंडगर - कुलगुरु | अध्यक्ष |
| २) | मा. प्रा. डॉ. ए. एन. बारबोले | सदस्य |
| ३) | मा. ॲड. रामदास पी. सब्बन | सदस्य |
| ४) | मा. डॉ. एल. पी. देशमुख | सदस्य |
| ५) | मा. प्राचार्य श्री. जे. के. बिले | सदस्य |
| ६) | मा. श्री. एन. बी. पवार | सदस्य |
| ७) | मा. श्रीमती एन. व्ही. साठे | सदस्या |
| ८) | मा. श्री. पी. एम. हिरेमठ | सदस्य |
| ९) | मा. प्राचार्य डॉ. एच. एन. जगताप | सदस्य |
| १०) | मा. श्री. बी. पी. रोंगे | सदस्य |
| ११) | मा. श्री. एन. आर. गरड | सदस्य |
| १२) | मा. श्री. जयसिंह मोहिते-पाटील | सदस्य |
| १३) | मा. डॉ. डी. जे. साळुंखे -परीक्षा नियंत्रक | स्थायी निमंत्रित |
| १४) | मा. डॉ. डी. डी. पुजारी -वित्त व लेखा अधिकारी | स्थायी निमंत्रित |
| १५) | मा. कॅप्टन डॉ. नि. पां. सोनजे, कुलसचिव | सदस्य सचिव |

**<u>स्वागतः</u>**

कुलसचिवपदी कॅप्टन डॉ. नि. पां. सोनजे यांची नियुक्ती झाल्यामुळे व्यवस्थापन परिषदेच्या सदस्यांनी त्यांचा पुष्पगुच्छ देऊन सत्कार केला. सूचक - प्रा. बी.पी. रोंगे व अनुमोदन - ॲड. रामदास पी. सब्बन.

नवनियुक्त कुलसचिव यांनी सर्व उपस्थित सन्माननीय सदस्यांचे स्वागत केले.

**<u>अनुपस्थिती:</u>**

मा. प्राचार्य डॉ. राजेंद्र एन. शेंडगे, संचालक म. व वि. वि. मंडळ, मा. डॉ. बी. बी. कदम, मा. डॉ. पी. जी. मोरे यांनी दूरध्वनीद्वारे आणि मा. प्राचार्य डॉ. सी. बी. कोळेकर यांनी पत्राद्वारे व्यवस्थापन परिषदेच्या या सभेस उपस्थित राहू शकत नसल्याचे कळविले आहे याची अध्यक्षांनी नोंद घेतली.

<u>**विषयपत्रिकेतील दोष दुरुस्ती :**</u>

१) विषय क्र. ०७ "विद्यापीठ परिसरातील तयार असलेले मुलींचे वसतिगृह दुसऱ्या सत्रापासून चालू करण्यासाठी अर्ज विक्रीस मान्यता मिळण्याबाबतचा विषय व्यवस्थापन परिषदेच्या मान्यतेसाठी" ऐवजी **"विद्यापीठ परिसरातील मुलींचे वसतिगृह दुसऱ्या सत्रापासून सुरु करण्यासाठी अर्जांची किंमत ठरविणे व अर्ज विक्रीस उपलब्ध करुन देण्याबाबत मा.कुलगुरुमहोदयांनी केलेली कार्यवाही माहितीस्तव"** माहितीसाठी अशी दुरुस्ती.

**सदर सभेस खालील प्रमाणे कामकाज झाले.**

**विषय क्र.१** **दि. १० सप्टेंबर, २००९ रोजी झालेल्या व्यवस्थापन परिषदेच्या सभेचा कार्यवृत्तांत वाचून कायम करणे.**

| | |
|---|---|
| **ठराव क्र.१** | **दि. १० सप्टेंबर, २००९ रोजी झालेल्या व्यवस्थापन परिषदेच्या सभेचा कार्यवृत्तांत खालील दुरुस्तीसह वाचून कायम करण्यात आला.**<br>१) कार्यवृत्तांतातील पान क्र. १६ वरील "परीक्षा विभागासाठी ------ माहितीस्तव" या विषयाचा विषय क्र. क्र. १३ ऐवजी १४ अशी दुरुस्ती. |

| | |
|---|---|
| **विषय क्र.२** | **महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ कलम २८ (x) नुसार व्यवस्थापन परिषदेस मा.कुलगुरु यांनी सादर करावयाचा अहवाल व्यवस्थापन परिषदेपुढे सादर.**<br>**(सोबत अहवाल जोडला आहे)** |

महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ कलम २८ (x) नुसार मा.कुलगुरु यांचा अहवाल व्यवस्थापन परिषदेपुढे सादर करणे आवश्यक आहे. त्यानुसार मा.कुलगुरु यांचा अहवाल व्यवस्थापन परिषदेपुढे सादर.

| | |
|---|---|
| **ठराव क्र.२** | **महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ कलम २८ (x) नुसार व्यवस्थापन परिषदेस मा.कुलगुरु यांनी सादर केलेल्या अहवालाची खालील दुरुस्तीसह नोंद घेण्यात आली.**<br>**१) विशेष कक्ष (बी.सी.सेल) ऐवजी विशेष कक्ष (Special Cell) असे नमूद करावे.**<br>**२) पान क्र. ३० वर, सामान्य प्रशासन परिच्छेद २ मध्ये "सोलापूर विद्यापीठस्तरीय लैंगिक छळ समिती" ऐवजी "सोलापूर विद्यापीठस्तरीय लैंगिक छळ प्रतिबंधक समिती" असे नमूद करावे.** |

**विषय क्र.३** **ग्रंथालय समितीच्या दि.३०/०९/२००९ रोजी झालेल्या सभेच्या कार्यवृत्तांतावर मा.कुलगुरु यांनी केलेली कार्यवाही माहितीस्तव.**

**(सोबत कार्यवृत्तांत जोडला आहे)**

(टिपणी: दि.३०/०९/२००९ रोजी दुपारी ०३:०० वा. ग्रंथालय समितीची सभा झाली. विषयपत्रिकेवर वार्षिक अहवाल, पुस्तके व नियतकालिके खरेदी तसेच वार्षिक अंदाजपत्रक इ. विषय विचारार्थ होते. ग्रंथालय समितीच्या सभेच्या कार्यवृत्तांतास महाराष्ट्र विद्यापीठे कायदा १९९४ मधील कलम ७५ (c) (iii) आणि (iv) अन्वये व्यवस्थापन परिषदेची मान्यता घेणे आवश्यक आहे. परंतू नजीकच्या काळात व्यवस्थापन परिषदेची सभा होणार नसल्याने व पुस्तके व नियतकालिके तातडीने खरेदी करणे गरजेचे असल्याने महाराष्ट्र विद्यापीठे कायदा १९९४ मधील कलम १४(७) अन्वये ग्रंथालय समितीच्या दि.३०/०९/२००९ रोजी झालेल्या सभेच्या कार्यवृत्तांतास मा.कुलगुरुमहोदयांनी व्यवस्थापन परिषदेच्या वतीने मान्यता दिलेली आहे.

मा.कुलगुरुमहोदयांनी केलेली कार्यवाही माहितीस्तव सादर).

| | |
|---|---|
| **ठराव क्र.३** | **मा. कुलगुरुमहोदयांनी केलेल्या कार्यवाहीची नोंद घेण्यात आली.** |

| | |
|---|---|
| **विषय क्र.४** | **जिल्हा प्रशासन व सामाजिकशास्त्रे संकूल यांच्यामध्ये Collaborative Activities करण्याची बाब व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ.** |

**(सोबत माहिती जोडली आहे)**

(टिपणीः विद्यापीठ अनुदान आयोगाच्या ११व्या पंचवार्षिक योजनेनुसार आणि राष्ट्रीय ज्ञान आयोगाच्या अहवालाच्या अनुषंगाने, सामाजिकशास्त्रे संकूल सामाजिक गरजांशी निगडीत प्रक्रियेबाबत जास्तीत जास्त चांगल्याप्रकारे संशोधन करण्यास इच्छुक आहे. याबाबत सामाजिकशास्त्रे संकूल जिल्हा प्रशासनासमवेत Collaborative Activities करण्यास तयार आहे आणि यासाठी संकूलाने या कार्यासाठी आठ ठिकाणांची निवड केलेली आहे. हा प्रयोग एकमेव प्रयोग म्हणून भारतामध्ये ओळखला जाणार आहे त्यामुळे विद्यापीठाच्या नावलौकिकामध्ये नक्कीच भर पडणार आहे असे मा. संचालक सामाजिकशास्त्रे संकूल यांनी कळविले असून सदरचा प्रस्ताव व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ सादर).

| | |
|---|---|
| **ठराव क्र.४** | **जिल्हा प्रशासन व सामाजिकशास्त्रे संकूल यांच्या संयुक्त विद्यमाने शैक्षणिक कार्यक्रम Collaborative Activities करण्यास मान्यता देण्यात आली.** |

| | |
|---|---|
| **विषय क्र.५** | **विद्यापीठ आवारात सेंट्रल बँक ऑफ इंडियाची विस्तार शाखा उघडण्यासाठी शाखा व्यवस्थापक, कोंडी शाखा यांचे पत्र व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ.** |

**(सोबत पत्र जोडले आहे)**

(टिपणी: दै. सकाळ मधील विद्यापीठामध्ये बँकेची शाखा उघडण्यासंबंधी आलेल्या बातमीच्या अनुषंगाने सेंट्रल बँकेच्या कोंडी शाखा यांनी **विद्यापीठासाठी व विद्यापीठाच्या कर्मचाऱ्यांसाठी ATM ची सुविधा, इंटरनेट बँकिंगची सुधिा, कर्जाची सुविधा व इतर सेवा** पुरविण्याची तयारी दर्शविली आहे.

सदरचे पत्र व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ सादर).

| | |
|---|---|
| **ठराव क्र.५** | **सेंट्रल बँक ऑफ इंडिया यांच्या दि.०७/१०/२००९ रोजीच्या पत्राची नोंद घेण्यात आली.** |

| | |
|---|---|
| **विषय क्र.६** | **महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग चार-ब सोमवार, सप्टेंबर १४, २००९ / भाद्र २३, शके १९३१ व क्रमांक युएसजी २००९/८५/०९)/विशि-४, दि. १४ सप्टेंबर, २००९ अन्वये, महाराष्ट्र विद्यापीठे कायदा १९९४ मधील कलमान्वये विद्यापीठाच्या कोणत्याही प्राधिकरणाचा सदस्य म्हणून निवडून येण्यासाठी किंवा नामनिर्देशित होण्यासाठी पात्रतेच्या शर्ती या शासन आदेशान्वये पारित केलेल्या आहेत. या व्यवस्थापन परिषदेच्या माहितीस्तव.** |

(विद्यापीठाच्या http://su.digitaluniversity.ac या संकेतस्थळावरील Home Page वर Circular/G.R./Notices या शिर्षकाखाली व University या शिर्षकाखालील University Elections या शिर्षकाखालील Circular/G.R.Notices याअंतर्गत उपलब्ध करुन देण्यात आलेल्या आहेत).

(टिपणी: महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग चार-ब सोमवार, सप्टेंबर १४, २००९ / भाद्र २३, शके १९३१ व क्रमांक युएसजी २००९/८५/०९)/विशि-४, दि. १४ सप्टेंबर, २००९ अन्वये, महाराष्ट्र विद्यापीठे कायदा १९९४ मधील कलमान्वये विद्यापीठाच्या कोणत्याही प्राधिकरणाचा सदस्य म्हणून निवडून येण्यासाठी किंवा नामनिर्देशित होण्यासाठी पात्रतेच्या शर्ती या शासन आदेशान्वये पारित केलेल्या आहेत. या पात्रतेच्या शर्ती विद्यापीठाच्या http://su.digitaluniversity.ac या संकेतस्थळावरील Home Page वर Circular/G.R./Notices या शिर्षकाखाली व University या शिर्षकाखालील University Elections या शिर्षकाखालील Circular/G.R.Notices याअंतर्गत उपलब्ध करुन देण्यात आलेल्या आहेत. याबाबत कार्यालयाकडील पत्र जा.क्र. सोविसो/सभावनिवडणूकाविभाग/४७२० दि.०९/११/२००९ अन्वये संलग्नित महाविद्यालयांना व संस्थांना कळविण्यात आलेले आहे.

सदरची बाब व्यवस्थापन परिषदेच्या माहितीस्तव सादर).

| | |
|---|---|
| **ठराव क्र.६** | **महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग चार-ब सोमवार, सप्टेंबर १४, २००९ / भाद्र २३, शके १९३१ व क्रमांक युएसजी २००९/८५/०९)/विशि-४, दि. १४ सप्टेंबर, २००९ या शासन आदेशाची नोंद घेण्यात आली.** |

| | |
|---|---|
| **विषय क्र.७** | **विद्यापीठ परिसरातील मुलींचे वसतिगृह दुसऱ्या सत्रापासून सुरु करण्यासाठी अर्जांची किंमत ठरविणे व अर्ज विक्रीस उपलब्ध करुन देण्याबाबत मा.कुलगुरुमहोदयांनी केलेली कार्यवाही माहितीस्तव.** |

(टिपणी : विद्यापीठातील मुलींचे वसतिगृह शैक्षणिक वर्ष २००९-२०१० च्या दुसऱ्या सत्रापासून मुलींना निवासासाठी उपलब्ध करुन देण्याचे निश्चित केले आहे. मुलींच्या वसतिगृहात प्रवेश मिळण्यासाठीचा प्रवेश अर्ज छापण्याचे काम प्रगतीपथावर आहे. सदरील प्रवेश अर्ज वसतिगृहाच्या नियम व अटीसह पाठपोट चार पानाचा आहे. एका प्रवेश अर्जासाठी छपाई खर्च अंदाजे रुपये - २.५० (अक्षरी दोन रुपये पन्नास पैसे) इतका आहे. त्यानंतर इतर प्रशासकीय कार्यवाही करावी लागणार असल्याने सदरचा प्रवेश अर्ज विक्रीची किंमत सर्वसाधारणपणे रु.१०/- ठरविणे उचित ठरते.

सदरचे प्रवेश अर्ज वेळेत उपलब्ध करुन देणे गरजेचे असल्याने सदरच्या प्रवेश अर्जासाठी रु.१०/- ही किंमत मा.कुलगुरुंनी व्यवस्थापन परिषदेच्या वतीने मान्य केलेली आहे. सदरची बाब व्यवस्थापन परिषदेच्या माहितीस्तव सादर).

| | |
|---|---|
| **ठराव क्र.७** | **मा.कुलगुरुमहोदयांनी केलेल्या कार्यवाहीची नोंद घेण्यात आली.** |

| विषय क्र.८ | **महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ कलम ७६ (२) (ङ) अन्वये विद्यापीठातील विविध संकूलातील शिक्षक पदांच्या निवड समितीवर सोबतच्या संकूलनिहाय नामिकेतील तज्ञांच्या नावाची शिफारस विद्यापरिषदेच्या शिफारशीनुसार व्यवस्थापन परिषदेसमोर विचारार्थ सादर.** |
|---|---|

(सोबत विषय तज्ञांची यादी जोडलेली आहे)

(टिपणी : विद्यापीठाने भूशास्त्र संकूल, सामाजिकशास्त्रे संकूल व संगणकशास्त्र संकूलातील विविध शिक्षक पदे भरण्यासाठी दि.०२/०७/२००९ रोजी जाहिरात प्रसिध्द केली होती. त्यामध्ये प्रत्येक पदासाठी विषय विशेषतः दर्शविलेली आहे.

त्या अनुषंगाने शिक्षक पदे भरण्यासाठी महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ मधील कलम ७६ (२) (ङ) मधील तरतूद खालीलप्रमाणे आहे.

*विद्यापीठाशी ज्या व्यक्ती संबंधित नसतील अशा आणि ज्या विषयासाठी अध्यापकांची निवड करावयाची असेल त्याविषयाचे ज्यांना विशेष ज्ञान आहे अशा विद्यापरिषदेने शिफारस केलेल्या सहा पेक्षा कमी नसतील इतक्या व्यक्तींच्या नामिकेमधून व्यवस्थापन परिषदेने नामनिर्देशित केलेल्या किमान तीन तज्ञ व्यक्ती.*

उक्त तरतूदीन्वये विद्यापरिषदेने सोबतच्या यादीतील तज्ञांची नामिका करावयाची आहे. तद्वतच सदरची नामिका ही संबंधित अभ्यासमंडळाचे अध्यक्ष, विभागप्रमुख व अधिष्ठाता यांनी तयार करुन विद्यापरिषदेच्या दि.१८ सप्टेंबर, २००९ रोजीच्या सभेतील विषय क्र.८८(१७) अन्वये शिफारशीनुसार व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ सादर).

| ठराव क्र.८ | **महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ कलम ७६(२)(ङ)[76(2)(e)] अन्वये विद्यापीठातील विविध संकूलातील शिक्षक पदांच्या निवड समितीवर सोबतच्या संकूलनिहाय नामिकेतील तज्ञांच्या नावांची विद्यापरिषदेने केलेली शिफारस स्विकारण्यात आली. उक्त नामिकेतील किमान तीन तज्ञ व्यक्ती नामनिर्देशित करण्याचे अधिकार मा.कुलगुरुमहोदयांना देण्यात आले.** |
|---|---|

**विषय क्र.९** **महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या दि.०७/१०/२००९ रोजीच्या अधिसूचनेन्वये, विद्यापीठाकडील शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना दि.०१ जानेवारी, २००६ पासून सहावा वेतन आयोग लागू करण्याबाबत मा.कुलगुरुमहोदयांनी केलेली कार्यवाही माहितीस्तव.**

(टिपणी : महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या **संकीर्ण २००९/(३२६/०९)-विशि-१ दि.०७/१०/२००९** रोजीच्या अधिसूचनेन्वये, महाराष्ट्रातील सर्व अकृषि विद्यापीठे व संलग्नित महाविद्यालयामध्ये कार्यरत असलेल्या शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना दि.०१ जानेवारी, २००६ पासून सहावा वेतन आयोग लागू करण्यात आलेला आहे. विद्यापीठाकडील शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची सहाव्या वेतन आयोगाप्रमाणे वेतननिश्चिती करण्यासाठी एक समिती गठीत करण्यात आलेली होती. या समितीने शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे सहाव्या वेतन आयोगाप्रमाणे वेतननिश्चितीचे फॉर्म तयार करुन बैठकीचा कार्यवृत्तांत सादर केला होता. विद्यापीठाकडील शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना सहावा वेतन आयोग लागू करण्याबाबत मा.कुलगुरु यांनी केलेली कार्यवाही व्यवस्थापन परिषदेच्या माहितीस्तव सादर).

| | |
|---|---|
| **ठराव क्र.९** | **मा. कुलगुरुमहोदयांनी केलेल्या कार्यवाहीची नोंद घेण्यात आली.** |

**विषय क्र.१० M. A. Mass Communication ही पदवी स्थापित करण्याची बाब व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ.**

(सोबत विद्यापरिषद सभा दि.१८/०९/२००९ ठराव क्र. ८८(१७) जोडला आहे)

(टिपणी: Journalism अभ्यासमंडळाच्या दि.१८/०२/०९ रोजीच्या बैठकीत ठराव क्र. ४ नुसार शै. वर्ष २००९-१० पासून U.G.C. ने निर्देशित केल्याप्रमाणे बॅचलर ऑफ जर्नलिझम ॲन्ड कम्युनिकेशन (बी.जे.सी.) या पदवी कोर्सच्या अभ्यासक्रमाचे स्वरुप एक वर्षाऐवजी एम.ए. मास कम्युनिकेशन अशी पदव्युतर पदवी अभ्यासमंडळाने स्विकारुन, विद्याशाखेकडे शिफारस केलेली आहे.

सामाजिकशास्त्रे विद्याशाखा दि.२७/०२/०९ रोजीच्या बैठकीत ठराव क्र. २० नुसार, M.A. Mass Communication ही पदवी स्विकारुन, विद्यापरिषदेकडे शिफारस केलेली आहे.

विद्यापरिषदेच्या दि.१८/०९/०९ रोजीच्या बैठकीत ठराव क्र. ८८(६८) नुसार, M.A. Mass Communication ही पदवी स्थापित करण्याची बाब विद्यापरिषदेने स्विकारुन, महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ कलम ३० (२) (क) नुसार, व्यवस्थापन परिषदेकडे शिफारस केलेली आहे.

M.A. Mass Communication ही पदवी स्थापित करुन जून २००९ पासून अंमलबजावणी करावयाची असल्याने व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ सादर).

| | |
|---|---|
| **ठराव क्र.१०** | **M. A. Mass Communication ही पदवी स्थापित करण्याबाबत विद्यापरिषदेने केलेली शिफारस स्विकारण्यात येऊन सदर पदवी स्थापित करण्यास व अनुषंगिक कार्यवाही करण्यास मान्यता देण्यात आली.** |

**विषय क्र.११ दि.१८/११/२००९ रोजीच्या बांधकाम समितीच्या सभेचा कार्यवृत्तांत मान्यतेस्तव सादर.**

**(सभेचा कार्यवृत्तांत सभेवेळी सादर करण्यात येईल)**

(टिपणी: बांधकाम समितीची सभा दि.१८/११/२००९ रोजी आयोजित करण्यात आलेली आहे. या सभेच्या कार्यवृत्तांतास व्यवस्थापन परिषदेची मान्यता स्टॅट्यूट क्रमांक 339 (f) [After the meeting, the minutes shall be drawn by the Member Secretary who shall get them approved from the Chairman. The recommendations of the Buildings and Works Committee shall be placed before the Management Council] अन्वये व्यवस्थापन परिषदेची मान्यता घेणे आवश्यक आहे.
सबब, बांधकाम समितीच्या सभेचा कार्यवृत्तांत मान्यतेस्तव सादर).

| | | |
|---|---|---|
| **ठराव क्र.११** | **दि.१८/११/२००९ रोजीच्या बांधकाम समितीच्या सभेचा कार्यवृत्तांत खालील दुरुस्तीसह मान्य करण्यात आला.**<br>**१) दि.१८/११/२००९ रोजीच्या बांधकाम समितीच्या कार्यवृत्तांतामध्ये मा. डॉ. पी. बी. बंडगर ऐवजी डॉ. बी. पी. बंडगर अशी दुरुस्ती करावी.**<br>**२) प्राचार्य डॉ. आर. एनस. शेंडगे ऐवजी प्राचार्य डॉ. राजेंद्र एन. शेंडगे अशी दुरुस्ती करावी.**<br>**३) विषय क्र.७ मधील क्र. ४ वगळावा.** | |
| | **बां. स. ठराव २:** | **बांधकाम समिती ठराव क्र.०२ अन्वये शिफारस स्विकारण्यात येऊन मान्यता देण्यात आली.** |
| | **बां. स. ठराव ३:** | **बांधकाम समिती ठराव क्र.०३ अन्वये शिफारस स्विकारण्यात येऊन मान्यता देण्यात आली.** |
| | **बां. स. ठराव ४:** | **बांधकाम समिती ठराव क्र.०४ अन्वये शिफारस स्विकारण्यात येऊन मान्यता देण्यात आली.** |
| | **बां. स. ठराव ५:** | **बांधकाम समिती ठराव क्र.०५ अन्वये शिफारस स्विकारण्यात येऊन मान्यता देण्यात आली.** |
| | **बां. स. ठराव ६:** | **बांधकाम समिती ठराव क्र.०६ अन्वये शिफारस स्विकारण्यात येऊन मान्यता देण्यात आली.** |
| | **बां. स. ठराव ७:** | **बांधकाम समिती ठराव क्र.०७ अन्वये मा.कुलगुरूमहोदयांनी केलेल्या कार्यवाहीची नोंद घेण्यात आली.** |
| | **बां. स. ठराव ८:** | **बांधकाम समिती ठराव क्र.०८ हा व्यवस्थापन परिषदेने गठीत केलेल्या उपसमितीकडे पाठवावा.** |
| | **बां. स. ठराव ९:** | **बांधकाम समिती ठराव क्र.०९ अन्वये शिफारस स्विकारण्यात येऊन मान्यता देण्यात आली.** |
| | **बां. स. ठराव १०:** | **बांधकाम समिती ठराव क्र.१० अन्वये शिफारस स्विकारण्यात येऊन मान्यता देण्यात आली.** |

**उर्वरित ठराव पुढील पानावर...**

पाठीमागील पानावरुन ठराव पुढे चालू...

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ठराव क्र. ११ | बां. स. ठराव ११: | बांधकाम समिती ठराव क्र.११ अन्वये शिफारस स्विकारण्यात येऊन मान्यता देण्यात आली. | | | |
| | बां. स. ठराव १२: | बांधकाम समिती ठराव क्र.१२ अन्वये शिफारस स्विकारण्यात येऊन मान्यता देण्यात आली. | | | |
| | बां. स. ठराव १३: | बांधकाम समिती ठराव क्र. १३ खालील दुरुस्तीसह स्विकारण्यात येऊन मान्यता देण्यात आली.<br>अ.क्र. ५ इतर खर्च खालीलप्रमाणे : | | | |
| | | 1) | 10% Electrification | : | 6,54,748=00 |
| | | 2) | 5% Work Charges Establishment | : | 3,27,374=00 |
| | | 3) | Add 3% For contingencies on | : | 1,96,424=00 |
| | | 4) | 1.25% Technical Sanction Charges (PWD) | : | 81,844=00 |
| | | | TOTAL Rs. | : | 12,60,390=00 |
| | बां. स. ठराव१४: | बांधकाम समिती ठराव क्र.१४ अन्वये शिफारस स्विकारण्यात येऊन मान्यता देण्यात आली. | | | |
| | बां. स. ठराव१५: | बांधकाम समिती ठराव क्र.१५ अन्वये शिफारस स्विकारण्यात येऊन मान्यता देण्यात आली. | | | |
| | बां. स. ठराव१६: | बांधकाम समिती ठराव क्र.१६ अन्वये शिफारस स्विकारण्यात येऊन मान्यता देण्यात आली. | | | |
| | बां. स. ठराव१७: | बांधकाम समिती ठराव क्र.१७ अन्वये शिफारस स्विकारण्यात येऊन मान्यता देण्यात आली. | | | |
| | बां. स. ठराव१८: | बांधकाम समिती ठराव क्र.१८ अन्वये शिफारस स्विकारण्यात येऊन मान्यता देण्यात आली. | | | |
| | बां.स.ठराव१९(१) | बांधकाम समिती ठराव क्र.१९(१) अन्वये शिफारस स्विकारण्यात येऊन मान्यता देण्यात आली. | | | |

| | |
|---|---|
| **विषय क्र.१२** | **प्रा. पी. बी. जोशी यांच्याकडे संचालक, महाविद्यालये व विद्यापीठ विकास मंडळ या पदाचा कार्यभार असताना नैसर्गिक वाढीचे प्रस्ताव मा. सहसंचालक, कोल्हापूर यांच्या कार्यालयास सादर करण्याकरिता कर्मचाऱ्यांच्या प्रवासभत्त्यापोटी दिलेल्या रकमेचा रु.१०३६/- चा परतावा अदा करण्याची बाब विचारार्थ.** |

(टिपणी: प्रा. पी. बी. जोशी यांच्याकडे संचालक, महाविद्यालये व विद्यापीठ विकास मंडळ या पदाचा कार्यभार असताना नैसर्गिक वाढीचे प्रस्ताव मा.सहसंचालक, कोल्हापूर विभाग, कोल्हापूर यांच्याकडे (१०० फाईल्स घेऊन) जाण्याकरिता त्यावेळी विभागाकडील डॉ. पी. डी. माळी संग्रहालय सहाय्यक व श्री. एस. एम. कुंभार रोजंदारी संगणक लेखनिक दि.२८/४/०८ रोजी गेलेले होते. प्रवास भत्त्यापोटी लागणारी रक्कम प्रा. पी. बी. जोशी यांनी दिलेली होती. डॉ. पी. डी. माळी व श्री. एस. एम. कुंभार यांची प्रवासभत्त्याची देयके पारित करण्यासाठी वित्त व लेखा विभागाकडे उशिरा प्राप्त झाली. त्यामुळे ही देयक पारित करण्यास व्यवस्थापन परिषदेची मान्यता घेणे आवश्यक आहे. प्रवासभत्त्यापोटी रक्कम प्रा. पी. बी. जोशी यांनी दिल्यामुळे डॉ. पी. डी. माळी यांना देयकापोटी द्यावयाची रक्कम रु.४१०/- व श्री. एस. एम. कुंभार यांना देयकापोटी द्यावयाची रक्कम रु.६२६/- अशी एकूण रक्कम रु.१०३६/- प्रा. पी. बी. जोशी यांना आदा करणे आवश्यक आहे.

सबब डॉ. पी. डी. माळी व श्री. एस. एम. कुंभार यांच्या देयकास व त्यापोटी अदा करावयाची रक्कम रु.१०३६/- प्रा. पी. बी. जोशी यांना आदा करण्याची बाब व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ सादर).

| | |
|---|---|
| **ठराव क्र.१२** | **प्रा. पी. बी. जोशी यांच्याकडे संचालक, महाविद्यालये व विद्यापीठ विकास मंडळ या पदाचा कार्यभार असताना नैसर्गिक वाढीचे प्रस्ताव मा. सहसंचालक, कोल्हापूर यांच्या कार्यालयास सादर करण्याकरिता कर्मचाऱ्यांच्या प्रवासभत्त्यापोटी दिलेल्या रकमेचा रु.१०३६/- चा परतावा आदा करण्यास दंडक १२२ अन्वये कार्यवाही करण्यास मान्यता देण्यात आली.** |

| | |
|---|---|
| **विषय क्र.१३** | **मा. विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण, सोलापूर विभाग सोलापूर कार्यालयाकरिता रंगभवन अभ्यासकेंद्राच्या पहिल्या माळयावरील जागा उपलब्ध करुन देण्याची बाब व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ.** |

(सोबत : विभागीय सहसंचालक (उ.शि) कोल्हापूर विभाग, कोल्हापूर यांचे पत्र)

(टिपणी: सोलापूर विभागाकरिता नवीन सहसंचालक कार्यालय सुरु करण्यास शासनाने मंजूरी दिली असून सदरच्या कार्यालयासाठी रंगभवन येथील अभ्यासकेंद्राच्या इमारतीमधील पहिल्या माळावरील जागा आवश्यक फर्निचरसहित तात्पुरत्या स्वरुपात सहसंचालक उच्च शिक्षण सोलापूर यांना उपलब्ध करुन देण्याबाबतचे पत्र देवून सहकार्य करावे अशी विनंती सोबतच्या पत्रान्वये विभागीय सहसंचालक (उ.शि.) कोल्हापूर विभाग, कोल्हापूर यांनी केलेली आहे.

सबब विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण, सोलापूर विभाग, सोलापूर कार्यालयाकरिता जागा उपलब्ध करुन देण्याची बाब व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ सादर).

| | |
|---|---|
| **ठराव क्र.१३** | **मा. विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण, सोलापूर विभाग सोलापूर कार्यालयाकरिता रंगभवन अभ्यासकेंद्राच्या पहिल्या माळयावरील जागा उपलब्ध करुन देण्याचा प्रस्ताव अमान्य करण्यात आला.**<br>**तथापि, सहसंचालक कार्यालयास शहरात उक्त जागेची उपलब्धता होत नसल्यास विद्यापीठ प्रांगणात केगांव परिसरात तात्पुरत्या स्वरुपात जागा उपलब्ध करुन देण्यास मान्यता देण्यात आली.** |

**विषय क्र.१४ स्टेट बँक ऑफ इंडिया या राष्ट्रीयीकृत बँकेसमवेत विद्यापीठ परिसरात सर्वसुविधा असणारी शाखा सुरु करण्याची बाब व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ.**

(टिपणी: स्टेट बँक ऑफ इंडिया या राष्ट्रीयीकृत बँकेच्या अधिकार मंडळाने विद्यापीठ प्रांगणात एक सर्वसुविधा असणारी शाखा सुरु करण्यास मान्यता दिलेली आहे. या शाखेमध्ये एटीएम सुविधा, नेटबँकिंग प्रणाली, कोर बँकिंग सोल्यूशन प्लटफॉर्म, इंटरनेट बँकिंग, मनी ट्रान्स्फर इ. अशा बहुविध अद्यावत सुविधा पुरविण्यास तयार असल्याचे कळविले आहे. यासाठी १०,००० स्वे. फूट जागा ९९ वर्षाच्या भाडेतत्वावर उपलब्ध करुन द्यावी अशी विनंती स्टेट बँक ऑफ इंडियाने केली आहे. स्टेट बँक ऑफ इंडियाची शाखा सुरु करण्यापूर्वी महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ मधील कलम २८ (एल) नुसार [provide buildings, premises, furniture, apparatus and other means needed for the conduct of the work of the university] अन्वये स्टेट बँक ऑफ इंडिया या बँकेला विद्यापीठ परिसरात जागा देण्यासाठी व्यवस्थापन परिषदेची मान्यता घेणे आवश्यक आहे. तसेच स्टेट बँक ऑफ इंडिया या बँकेसमवेत सामंजस्य करार करण्यापूर्वी महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ मधील कलम २८ (एफ) नुसार [enter into, vary, carry out and cancel contracts on behalf of the university] मान्यता घेणे आवश्यक आहे.

सबब, स्टेट बँक ऑफ इंडिया या बँकेला विद्यापीठाच्या ५०० एकर प्रांगणात जागा ९९ वर्षाच्या भाडेतत्वावर उपलब्ध करुन देण्याबाबत व बँकेची शाखा विद्यापीठ परिसरात सुरु करण्याबाबत बँकेबरोबर सामंजस्य करार करण्याबाबतचा प्रस्ताव व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ सादर).

| | |
|---|---|
| **ठराव क्र.१४** | **स्टेट बँक ऑफ इंडिया या राष्ट्रीयीकृत बँकेसमवेत विद्यापीठ परिसरात सर्वसुविधा असणारी शाखा सुरु करण्याच्या प्रस्तावास तत्वत: मान्यता देण्यात आली. सर्वंकष प्रस्ताव स्टेट बँक ऑफ इंडिया यांच्याकडून मागवून घ्यावा असे ठरले.** |

| | |
|---|---|
| **विषय क्र.१५** | **सोलापूर विद्यापीठ परिसरातील पदार्थविज्ञान संकूल, संगणकशास्त्र संकूल, मुलींचे वसतिगृह, सामाजिकशास्त्रे संकूल तसेच सोलापूर शहरातील रंगभवन येथील अभ्यासकेंद्र, अतिथीगृह इमारतीच्या साफसफाई कामाबाबत केलेल्या प्रक्रियेची बाब व्यवस्थापन परिषदेच्या माहितीस्तव सादर.** |

(टिपणीः- वरील विषयांकित इमारतीमधील साफसफाई कामासंबंधी सहा संस्था, फर्म कडून विद्यापीठ कार्यालयीन पत्र क्र. सोविसो/स्वच्छता निविदा प्रक्रिया/१०३५/२००९, दि.२०/५/०९ अन्वये दरपत्रके हस्तपोच दि.२५/५/०९ पर्यंत मागविण्यात आली होती.

त्यापैकी नमूद केलेल्या तारखेपर्यंत तीन संस्था/फर्मकडून दरपत्रके प्राप्त झाली होती. दरपत्रके प्राप्त झालेल्या संस्थेस दरवाटाघाटीस मा. कुलगुरुमहोदयांच्या आदेशान्वये दि.५/६/०९ रोजी दुपारी ३:०० वा. उपस्थित रहाण्याबाबत कळविण्यात आले होते.

त्याप्रमाणे गठीत करण्यात आलेल्या दरवाटाघाटी समितीसमोर दि.५/६/०९ रोजी प्रत्यक्ष प्राप्त दरपत्रकाच्या अनुषंगाने संबंधितांशी चर्चा करुन त्यापैकी चेअरमन वाल्मिकी स्वच्छता कामगार पुरविणारी स्वयंरोजगार सेवा संस्था मर्या. सोलापूर या संस्थेस स्वच्छतेच्या कामाची ऑर्डर दरमहा रु.१८,०००/- (अक्षरी रुपये अठरा हजार फक्त) इतक्या रकमेस १२ महिन्यासाठी देण्याबाबत ठरले. त्यानुसार, पत्र क्र. सोविसो/इमारत स्वच्छतानिविदा/२००९/१६०५, दि.१५/६/०९ अन्वये ऑर्डर देण्यात आली.

सदरची बाब व्यवस्थापन परिषदेच्या माहितीस्तव सादर).

| | |
|---|---|
| **ठराव क्र.१५** | **सोलापूर विद्यापीठ परिसरातील पदार्थविज्ञान संकूल, संगणकशास्त्र संकूल, मुलींचे वसतिगृह, सामाजिकशास्त्रे संकूल तसेच सोलापूर शहरातील रंगभवन येथील अभ्यासकेंद्र, अतिथीगृह इमारतीच्या साफसफाई कामाबाबत केलेल्या प्रक्रियेची नोंद घेण्यात आली.** |

**विषय क्र.१६** **प्रभारी प्राचार्यांच्या निवडीबाबतचा विषय व्यवस्थापन परिषदेच्या समोर सादर.**

(टिपणी: व्यवस्थापन परिषदेच्या दि.१० सप्टेंबर, २००९ च्या बैठकीत ठराव क्र. २ मधील मुद्दा क्र. ३ नुसार विषय पुढील बैठकीत ठेवावा असे ठरले आहे.

विद्यापीठ स्टॅट्यूट (परिनियम) १९३ मधील (२) खालीलप्रमाणे आहे.

II) a) If a Principal proceeds on earned leave at a time other than vacation or if there is a temporary vacancy of the post of Principal the vacancy shall be filled in by assigning the current duties of the post of Principal to the Vice-Principal in addition to his own duties, if there is a post of Vice-Principal. In case there is no post of Vice-Principal the current duties of the post of Principal shall be assigned to the senior-most teacher in the College in addition to his own duties as an alternative arrangement. For these additional duties of the post of Principal the person holding the additional charge shall be paid additional pay/special pay at the rate of 20% of the presumptive pay of the second post subject to the following conditions :

i) Such allowance be granted in the cases where the additional charge is held for not less than 15 days; and

ii) Additional pay/special pay is restricted for a period of six months only.

b) Any other teacher who is required to work during vacation shall be entitled to leave on full pay and allowances for 1/3 number of days for which he is required to work during vacation.

यानुसार ६ महिन्याकरिता प्रभारी प्राचार्य म्हणून विद्यापीठाच्या निवड समिती मार्फत निवड झालेल्या नियमित अधिव्याख्यात व सेवा ज्येष्ठ अधिव्याख्यात्यास ६ महिन्याकरिता प्रभारी प्राचार्य म्हणून तात्पुरती मान्यता दिली जात होती.

महाराष्ट्र शासनाकडून व नागपूर खंडपीठाच्या निर्णयास अनुसरुन वेळोवेळी आलेल्या आदेशानुसार / सूचनेनूसार प्रभारी प्राचार्य म्हणून मान्यता देण्याचे काम प्रलंबित ठेवण्यात आलेले आहे. यामागील कारण संबंधित महाविद्यालयाने नियमित प्राचार्य सत्वर भरावेत.

विद्यापीठाच्या निवड समितीने मान्यता दिलेल्या सेवाज्येष्ठ अधिव्याख्याता यासच प्रभारी प्राचार्य म्हणून मान्यता देण्यात येते. तसेच विद्यापीठाची निवड समिती प्रभारी प्राचार्य पदाच्या निवडीसाठी दिली जात नाही.

सदरची बाब व्यवस्थापन परिषदेच्या माहितीस्तव सादर).

| | |
|---|---|
| **ठराव क्र.१६** | **प्रभारी प्राचार्यांच्या निवडीबाबत विद्यापीठ परिनियम १९३(२) मधील तरतूदीची नोंद घेण्यात आली.** |

**विषय क्र.१७** **द गॅझेट ऑफ इंडिया, दिनांक ११ जुलै २००९ च्या** Minimum Standards and procedure for award of M.Phil./Ph.D., Regulation, 2009 **नुसार एम.फिल. व पीएच.डी. पदवीसाठीचा तयार केलेला दंडक व्यवस्थापन परीषदेच्या विचारार्थ.**

**(सोबत नियोजित दंडकाची प्रत जोडलेली आहे)**

(टिपणी : द गॅझेट ऑफ इंडिया, दिनांक ११ जुलै २००९ च्या Minimum Standards and procedure for award of Ph.D., Regulation, 2009 नुसार एम.फिल. व पीएच.डी. अभ्यासक्रमासाठीची सुधारित नियमावली तयार करण्यासाठी दिनांक १८ सप्टेबर २००९ रोजीच्या विद्यापरिषदेमध्ये ठराव क्र. ८८(५७) नुसार सर्व विद्याशाखेच्या अधिष्ठाताची बैठक घेऊन निर्णय घ्यावा असे ठरले.

दिनांक १५ ऑक्टोबर २००९ सर्व अधिष्ठाताची बैठक झाली. यामध्ये सुधारीत नियमावलीमध्ये सर्व विद्याशाखेच्या अधिष्ठातानी योग्य ते बदल सुचवून नियमावलीची शिफारस केली. तयार केलेल्या नियमावलीस मा.कुलगुरु यांनी विद्यापरिषदेच्या वतीने मान्यता दिलेली आहे.

महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ कलम ५३(i) व ५४(१) अन्वये सदरचा दंडक तयार करुन त्यास मा.कुलपती तथा राज्यपाल यांची मंजूरी घेणे आवश्यक आहे. सदरच्या एम.फिल. व पीएच.डी. पदवीसाठीचा तयार केलेला दंडक व्यवस्थापन परिषदेच्या मान्यतेसाठी विचारार्थ सादर).

| | |
|---|---|
| **ठराव क्र.१७** | **द गॅझेट ऑफ इंडिया, दिनांक ११ जुलै २००९ च्या** Minimum Standards and procedure for award of M.Phil./Ph.D., Regulation, 2009 **नुसार एम.फिल. व पीएच.डी. पदवीसाठीचा तयार केलेल्या दंडकाची शिफारस मा.कुलगुरुमहादेयांनी विद्यापरिषदेच्या वतीने केलेली कार्यवाही स्विकारण्यात येऊन दुरुस्तीसह दंडकासंदर्भात विहीत कार्यवाही करण्यास मान्यता देण्यात आली.**<br>**दंडकात आवश्यक त्या दुरुस्त्या करण्यास खालील समिती गठीत करण्यात आली.**<br>**१) प्रा. बी. पी. रोंगे - सदस्य, व्यवस्थापन परिषद**<br>**२) श्रीमती एन. व्ही. साठे - सदस्या, व्यवस्थापन परिषद**<br>**उपनिर्दिष्ट समितीने दंडकात आवश्यक त्या दुरुस्त्या करुन पत्र प्राप्त होताच अत्यंत तातडीने दंडक कार्यालयास सादर करावयात.** |

**विषय क्र.१८ विना खंडित विद्युत पुरवठा होण्यासाठी एक्सप्रेस फीडरवरुन टॅप कनेक्शन सावित्रीबाई फुले शिक्षण प्रसारक मंडळ सोलापूर यांना देण्याची बाब व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ.**

(सोबत : सावित्रीबाई फुले शिक्षण प्रसारक मंडळ सोलापूर यांचे पत्र)

(टिपणी: विनाखंडीत विद्युत पुरवठा होण्यासाठी एक्सप्रेस फीडरबाबतची पार्श्वभूमी खालीलप्रमाणे आहे.

१) सोलापूर विद्यापीठ, सोलापूर महानगरपालिका, दूध पंढरी आणि इंदिरा गांधी अभियांत्रिकी महाविद्यालय या चौघांमध्ये एक्सप्रेस फीडर घेण्याचे ठरले होते.
२) याबाबतचा विषय व्यवस्थापन परिषदेच्या दि.०५/०७/२००६ रोजी आयत्या वेळेचा विषय क्र.१२ अन्वये सादर करण्यात आला होता.
३) यावरील ठरावानुसार, सोलापूर महानगरपालिका व इंदिरा गांधी अभियांत्रिकी महाविद्यालय यांनी एक्सप्रेस फीडर घेण्याकरीता नकार दिला.
४) त्यामुळे दूध पंढरी व सोलापूर विद्यापीठ यांची संयुक्तपणे एक्सप्रेस फीडर घेण्याची तयारी दर्शविली.
५) यानुसार एक्सप्रेस फीडरपोटी येणाऱ्या एकूण खर्चापैकी रु.१२,८३,६५०/- (एकूण रकमेच्या ५०टक्के रक्कम) ही रक्कम दि.०४ जानेवारी २००७ रोजी भरलेली आहे.
६) सोलापूर महानगरपालिकेचा पुणे नाका येथील जकात नाका केगांव येथे असल्याने त्याचा ग्रामीण हद्दीत समावेश होतो. ग्रामीण विभागात सध्या १२-१२ तास विद्युत भारनियमन होत आहे. त्यामुळे सोलापूर महानगरपालिकेने सोलापूर विद्यापीठाकडील असणाऱ्या एक्सप्रेस फीडरवरुन टॅप कनेक्शन मागणी केलेली होती. याबाबत विषय व्यवस्थापन परिषदेच्या दि.३० मार्च, २००९ च्या बैठकीत विषय क्र. १२ अन्वये ठराव खालीलप्रमाणे:

*सोलापूर महानगरपालिका सोलापूर यांच्या सोलापूर विद्यापीठासमोरील जकात नाका येथे विना खंडीत विद्युत पुरवठा होण्यासाठी एक्सप्रेस फीडरवरुन टॅप कनेक्शन देण्याच्या प्रस्तावास खालील अटीच्या आधीन राहून मान्यता देण्यात आली.*

*१) एक्सप्रेस फीडरसाठी आलेल्या एकूण आलेल्या खर्च रु.२५,८६,७५०/- पैकी १/३ रक्कम सोलापूर महानगरपालिकेने विद्यापीठ आणि दूध पंढरी यांच्याकडे जमा करावी.*

ठराव क्र. १ नुसार, कार्यालयाचे पत्र क्र. एसओएल/१४०० दि.०५/०६/०९ अन्वये मा. आयुक्त सोलापूर महानगरपालिका यांना कळविले आहे. अद्यापही त्यांच्याकडून कोणतीही कार्यवाही झाल्याचे दिसून येत नाही.

सावित्रीबाई फुले शिक्षण प्रसारक मंडळ सोलापूर यांनी एक्सप्रेस फीडरवरुन टॅप कनेक्शन द्यावी अशी विनंती केली आहे. एक्सप्रेस फीडरपोटी आलेल्या खर्चापैकी १/३ किंवा ५०टक्के रक्कम भरण्याची तयारी दर्शविली आहे.

सबब, सावित्रीबाई फुले शिक्षण प्रसारक मंडळ सोलापूर यांच्या विनंतीनुसार सोलापूर विद्यापीठाकडील एक्सप्रेस फीडरवरुन टॅप कनेक्शन देण्याबाबतचा प्रस्ताव व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ सादर).

| | |
|---|---|
| **ठराव क्र.१८** | **विना खंडित विद्युत पुरवठा होण्यासाठी एक्सप्रेस फीडरवरुन टॅप कनेक्शन सावित्रीबाई फुले शिक्षण प्रसारक मंडळ सोलापूर यांना खालील अटीस अधीन राहून मान्यता देण्यात आली.**<br>**१) एक्सप्रेस फीडरसाठी आलेल्या एकूण खर्च रु.२५,८६,७५०/- पैकी ५०टक्के रक्कम व्याजासह सोलापूर विद्यापीठ व दूधपंढरी यांना आदा करावी.** |

| | |
|---|---|
| **विषय क्र.१९** | **सन २०१० मध्ये घेण्यात येणाऱ्या निवडणूका निर्विवादपणे पार पाडण्याकरीता एका मानसेवी अधिकाऱ्याची नियुक्ती करण्याबाबत व त्यांचे मानधन ठरविण्याची बाब व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ.** |

(टिपणीः सोलापूर विद्यापीठाची स्थापना दि.२२ जुलै, २००४ रोजीच्या शासन अधिसूचनेन्वये झालेली असून प्रत्यक्षात कामकाजास दि. ०१ ऑगस्ट, २००४ पासून सुरुवात झालेली आहे. स्थापनेनंतर महाराष्ट्र शासनाने म. वि. का. १९९४ मधील कलम ११२ अन्वये, कुलगुरु, कुलसचिव, संचालक महाविद्यालये व विद्यापीठ विकास मंडळ, परीक्षा नियंत्रक व वित्त व लेखा अधिकारी या संविधानिक पदांवरील अधिकाऱ्यांची नियुक्ती केली होती. या कलमानुसार पहिल्या व्यवस्थापन परिषद व विद्यापरिषद या अधिकार मंडळाचेही गठन दि.०२ नोव्हेंबर, २००५ रोजीच्या पत्रान्वये केलेले आहे.

प्रस्तुत विद्यापीठासाठी सन २०१० हे निवडणूकीचे वर्ष असून पहिल्यांदाच निवडणूका घेण्यात येणार आहेत.

निवडणूक प्रक्रिया निर्विवादपणे व व्यवस्थितपणे पार पाडणे अत्यंत गरजेचे आहे. निवडणूक प्रक्रियेच्या कामाकाजामध्ये महाराष्ट्रातील बरीच विद्यापीठे बाहेरील व्यक्तींकडून मदत घेत असतात. प्रस्तुत विद्यापीठाच्या बाबतीत निवडणूक प्रक्रियेची संपूर्ण माहिती असलेली व निवडणूक प्रक्रियेचे कामकाज केलेली व्यक्ती मानसेवी अधिकारी म्हणून नियुक्त केल्यास निवडणूकपूर्व व निवडणूकीनंतरचे कामकाज करणे सोयीचे होईल.

ही बाब विचारात घेता, निवडणूक प्रक्रियेची संपूर्ण माहिती असलेली व निवडणूक प्रक्रियेचे कामकाज केलेली एक व्यक्ती मानसेवी अधिकारी म्हणून नियुक्त करण्याबाबत व त्यांचे मानधन ठरविण्याची बाब व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ सादर).

| | |
|---|---|
| **ठराव क्र.१९** | **सन २०१० मध्ये घेण्यात येणाऱ्या निवडणूका निर्विवादपणे पार पाडण्याकरीता एका मानसेवी अधिकाऱ्याची नियुक्ती करण्यास व प्रति महिना रु.१५,०००/- एकत्रित वेतनावर निवडणूक प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत मान्यता देण्यात आली.** |

**<u>मा.कुलगुरु यांच्या परवानगीने येणारे आयत्या वेळेचे विषय:</u>**

| | |
|---|---|
| **विषय क्र. [ २०(१)]** | **शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर यांच्याकडे जमा असलेल्या रकमेपैकी सोलापूर जिल्ह्याचा हिस्सा असलेली रक्कम सोलापूर विद्यापीठास मिळण्याबाबत प्रस्ताव व्यवस्थापन परिषदेच्या माहितीसाठी सादर.** |

टिपणी : सोलापूर विद्यापीठाच्या स्थापनेनंतर शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर यांच्याकडे जमा असलेल्या रकमेपैकी सोलापूर जिल्ह्याचा हिस्सा मिळणे गरजेचे आहे. याबाबत मा.राज्यमंत्री श्री. सुरेश शेट्टी यांनी विधानपरिषदेमध्ये शिवाजी विद्यापीठाकडे जमा असलेल्या निधीमधून सोलापूर जिल्ह्याचा हिस्सा म्हणून येणारी रक्कम देण्याबाबत आश्वासन दिले होते. त्या अनुषंगाने मा.प्रधान सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई यांनी पाठविलेले पत्र दि.०४/०९/२००८ रोजीच्या व्यवस्थापन परिषदेच्या सभेत ठेवण्यात आले होते. नंतर, यासंदर्भात कुलगुरु शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर व कुलगुरु सोलापूर विद्यापीठ सोलापूर यांची दि.११/०९/२००८ रोजी शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर येथे बैठक झाली. या सभेचा कार्यवृत्तांत व्यवस्थापन परिषदेच्या दि.०७/११/२००८ रोजीच्या (१८/१०/२००८ ची पुढे गेलेली सभा) सभेमध्ये विषय क्र. ९(१४) अन्वये ठेवलेला होता. या विषयावरील ठरावानंतर सदरचा ठराव व दि.११/०९/२००८ रोजीच्या सभेचा कार्यवृत्तांत शासनास पाठविण्यात आला होता. शासनाने पत्र क्र. एसयुएस२००४/प्र.क्र.१३४/विशि-५, दि.२६/१२/२००८ अन्वये यासंदर्भात शिवाजी विद्यापीठास पत्र पाठविले असून त्याची एक प्रत सोलापूर विद्यापीठास पाठविलेली आहे. यानंतर, शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर यांनी सदर प्रकरणाबाबत विषय शिवाजी विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेपुढे विचारार्थ ठेवल्याचे कळविले आहे. ही बाब सोलापूर विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेच्या दि.१२/०६/२००८ रोजीच्या सभेत विषय क्र. २३ अन्वये सादर केली असता, सदर प्रस्ताव मागे घेण्यात आला असा ठराव झालेला होता. तद्नंतर दि.१५/१०/२००९ रोजी शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर यांनी रु.१५,५६,७४८/- ही रक्कम डी. डी. द्वारे सोलापूर विद्यापीठास दिली आहे. दि.१२/०६/२००८ रोजीच्या व्यवस्थापन परिषदेच्या सभेचा कार्यवृत्तांत वाचून कायम करताना सदरचा विषय पुढील सभेत सादर करावा असे ठरले आहे. सदर बाब व्यवस्थापन परिषदेच्या माहितीसाठी सादर).

| | |
|---|---|
| **ठराव क्र. २०(१)** | **शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर यांच्याकडे जमा असलेल्या रकमेपैकी सोलापूर जिल्ह्याचा हिस्सा असलेली रक्कम सोलापूर विद्यापीठास मिळण्याबाबत प्रस्तावापैकी पात्रता शुल्काचे रु.१५,५६,७४८/- विद्यापीठास मिळाल्याची नोंद घेण्यात आली व तपशील अमान्य करण्यात आला.**<br>**१) मा. राज्यमंत्री श्री. सुरेश शेट्टी यांनी दिलेल्या आश्वासन व मा.प्रधान सचिव उच्च व तंत्र शिक्षण मुंबई यांच्या दि.०४/०९/०८ रोजीच्या पत्राच्या अनुषंगाने, उर्वरित रकमेसाठी शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर यांना आदेश द्यावेत अशी विनंती शासनास करावी.** |

| विषय क्र. [ २०(२)] | **तक्रार निवारण समितीने केलेल्या शिफारशी व्यवस्थापन परिषदेच्या मान्यतेसाठी.** |
|---|---|

(सोबत कार्यवृत्तांत जोडला आहे)

(टिपणीः तक्रार निवारण समितीकडे प्राप्त झालेल्या अर्जावर दि.१६/११/२००९ रोजी सुनावणी घेण्यात आली. दि.१६/११/२००९ रोजीच्या बैठकीत सुनावणी झालेल्या तक्रार अर्जा संदर्भातील शिफारशी सोबत जोडलेल्या आहेत.

सदरच्या शिफारसींना स्टॅट्यूट क्रमांक ३३५ अन्वये, व्यवस्थापन परिषदेची मान्यता घेणे आवश्यक आहे.

सबब, तक्रार निवारण समितीच्या शिफारशी व्यवस्थापन परिषदेच्या मान्यतेसाठी सादर).

| ठराव क्र. २०(२) | **तक्रार निवारण समितीने केलेल्या शिफारशी खालील दुरुस्तीसह स्विकारण्यात येऊन मान्यता देण्यात आली.**<br>**१) त. नि. स. ठराव क्र. २ बाबत परिनियम ३३५ मधील तरतूदीन्वये दोन्ही पक्षकारांना पुढील व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीच्या वेळी सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत कळवावे व त्याबाबत स्वतंत्र विषय ठेवावा.** |
|---|---|

**विषय क्र. [ २० (३) ]** **Commonwealth Education Partnership, Commonwealth Education Online (www.cedol.org) यांच्या संयुक्त विद्यमाने Nexus यांच्याकडून Commonwealth Secretariat (COMSEC) या अहवालात विद्यापीठाच्या सहभागाबाबतचा प्रस्ताव व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ.**

(सोबत Catherine Davis, Partnership Coordinator यांच्याकडून ई-मेलद्वारे प्राप्त झालेला प्रस्ताव जोडला आहे)

(टिपणीः Commonwealth Education Partnership, Commonwealth Education Online (www.cedol.org) यांच्या संयुक्त विद्यमाने Nexus यांच्याकडून Commonwealth Secretariat (COMSEC) या अहवालाचे सन २०१०-११ मध्ये प्रकाशन करण्यात येणार आहे. यामध्ये विद्यापीठाची संक्षिप्त माहिती (Profile) वर आधारित एक चित्रफीत तयार करण्यात येणार आहे. सदरच्या अहवालाची www.cedol.org या संकेतस्थळावर सोलापूर विद्यापीठाच्या बोधचिन्हावर लिंक देण्यात येणार आहे. या अहवालामध्ये प्रोफाईल प्रसिध्दीकरीता विद्यापीठास त्याच्या दराप्रमाणे खालीलप्रमाणे शुल्क द्यावे लागणार आहे.

| अ.क्र. | पानाची साईज | जाहिरातीचा दर | जाहिरातीचा दर प्रति यु.के. डॉलर (भारतीय रुपयांमध्ये) | एकूण रुपये (भारतीय रुपयांमध्ये) |
|---|---|---|---|---|
| 1) | HALF PAGE | UK£5,500 | 77.4427 | 4,25,935/- |
| 2) | FULL PAGE | UK£9,750 | 77.4427 | 7,55,066/- |
| 3) | DOUBLE PAGE | UK£16,250 | 77.4427 | 12,58,444/- |
| 4) | 4-Page Feature | UK£27,500 | 77.4427 | 21,29,674/- |

या प्रोफाईल प्रसिध्दीमुळे विद्यापीठाच्या नावलौकिकामध्ये भर पडण्यास मदत होईल असे Catherine Davis, Partnership Coordinator यांनी त्यांच्या प्रस्तावामध्ये नमूद केलेले आहे.

सबब, सदरचा प्रस्ताव व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ सादर).

| ठराव क्र. २०(३) | **Commonwealth Education Partnership, Commonwealth Education Online (www.cedol.org) यांच्या संयुक्त विद्यमाने Nexus यांच्याकडून Commonwealth Secretariat (COMSEC) या अहवालात विद्यापीठाच्या सहभागाबाबतचा प्रस्ताव अमान्य करण्यात आला.** |
|---|---|

| | |
|---|---|
| **विषय क्र. [ २० (४) ]** | **Employability Skill Development Challenges in India and the way Forward या विषयावरील सेमिनार घेण्याबाबतचा प्रस्ताव व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ.** |

(सोबत Sanjiv Mehta, Advisor, Seven Rings International (Italy) यांचा प्रस्ताव जोडला आहे)

(टिपणीः Sanjiv Mehta, Advisor, Seven Rings International (Italy) यांचा **Employability Skill Development Challenges in India and the way Forward** या विषयावरील सेमिनाराचे या विद्यापीठामध्ये आयोजन करावे याबाबतचा प्रस्ताव दिलेला आहे. या सेमिनारच्या आयोजनासाठी अंदाजे रु.४ ते ५ लाख खर्च अपेक्षित आहे. या सेमिनारच्या आयोजनामुळे शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी यांच्या गुणवत्तेमध्ये वाढ होणार असून यामुळे विद्यापीठाच्या नावलौकिकामध्ये भर पडण्यास मदत होईल असे Sanjiv Mehta, Advisor, Seven Rings International (Italy) यांनी त्यांच्या प्रस्तावामध्ये नमूद केलेले आहे.

सबब, सदरचा प्रस्ताव व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ सादर).

| | |
|---|---|
| **ठराव क्र. २०(४)** | **Employability Skill Development Challenges in India and the way Forward या विषयावरील सेमिनार घेण्याबाबतचा प्रस्ताव अमान्य करण्यात आला.** |

| | |
|---|---|
| **विषय क्र. [ २० (५) ]** | **कला व भाषा, मुलांचे वसतिगृह या इमारतीच्या बांधकामासाठी वापरण्यात आलेल्या स्टीलचा विशेष सूट अंतर्गत भाववाढीसाठी करण्यात आलेला ठराव फेरविचारार्थ सादर.** |

(टिपणी: कला व भाषा, मुलांचे वसतिगृह या इमारतीच्या बांधकामासाठी वापरण्यात आलेल्या स्टीलचा विशेष सूट अंतर्गत भाववाढीसाठी दि. २५ मार्च, २००९ रोजी झालेल्या तांत्रिक समितीच्या बैठकीत ठराव क्र. ०२ व ०३ अन्वये बांधकाम समितीस खालीलप्रमाणे शिफारशी करण्यात आलेल्या होत्या.

**ठराव क्र. २ व ३:** ***शासनाच्या धोरणानुसार स्टीलमध्ये झालेल्या असाधारण भाववाढीची विशेष सवलत मान्य करण्यात आली.***

उक्त शिफारशी बांधकाम समितीच्या दि.२६ मार्च, २००९ रोजी झालेल्या बैठकीतील ठराव क्र. ०२ अन्वये व्यवस्थापन परिषदेस शिफारस करण्यात आल्या.

**ठराव क्र. २ व ३:** ***तांत्रिक समितीने मुलांचे वसतिगृह इमारतीसाठी सादर केलेल्या अपूर्ण राहिलेल्या कामाच्या अंदाजपत्रकावर चर्चा करुन उर्वरित काम मे. एन.एम. मंठाळकर यांचेकडून पूर्ण करुन घेण्याबाबत व्यवस्थापन परिषदेस शिफारस करीत आहे.***

सदर शिफारस दि.३० मार्च, २००९ रोजीच्या व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीतील विषय क्र. २८(२) अन्वये मान्य करण्यात आली. तद्नंतर संबंधितास कार्यालयीन पत्र क्र. सोविसो/५६ दि.०६ एप्रिल, २००९ रोजीच्या पत्रान्वये कळविण्यात आले होते. त्यानंतर मे एन. एम. मंठाळकर यांनी स्टीलसाठी विशेष सूट असणारी रक्कम रु.११,१८,२१०/- चे बिल दि.३०/०४/०९ रोजी विद्यापीठास सादर केले. तद्नंतर दि.०५/०९/०९ रोजीच्या पत्रान्वये सदर देयक आदा करण्याबाबत विनंती केली आहे. त्यास अनुसरुन सोलापूर विद्यापीठाचे प्रोजेक्ट मॅनेजमेंट कन्सल्टंट श्री. साई स्ट्रक्चर्स सोलापूर यांनी सदर देयक प्रमाणित करीत असताना सार्वजनिक बांधकाम विभागाचे पत्र संदर्भाकरीता तपासले असता, सदर देयक आदा करण्याबाबत स्पष्टीकरण होत नसल्याचे दि.३०/१०/०९ रोजीच्या पत्रात नमूद केले आहे.

यास अनुसरुन ही बाब बांधकाम समितीच्या दि.१८/११/२००९ रोजी झालेल्या बैठकीत विचारार्थ ठेवली असता ठराव क्र. ०५ अन्वये ***सार्वजनिक बांधकाम खात्याचा कोणताही शासन आदेश व मे. साई स्ट्रक्चरर्स सोलापूर यांनी कोणतीही स्पष्ट शिफारस केलेली नसल्याने कला व भाषा, मुलांचे वसतिगृह या इमारतीसाठी वापरण्यात आलेल्या स्टीलचा विशेष सूट अंतर्गत भाववाढ देता येणार नाही अशी शिफारस करण्यात आली.***

या अनुषंगाने कला व भाषा, मुलांचे वसतिगृह इमारतीच्या बांधकामासाठी वापरण्यात आलेल्या स्टीलचा विशेष सूट अंतर्गत भाववाढीसंदर्भातील करण्यात आलेला ठराव फेरविचारार्थ सादर).

| | |
|---|---|
| **ठराव क्र. २०(५)** | **कला व भाषा, मुलांचे वसतिगृह या इमारतीच्या बांधकामासाठी वापरण्यात आलेल्या स्टीलचा विशेष सूट अंतर्गत भाववाढीसाठी करण्यात आलेला ठराव फेरविचारार्थ घेता, दि.१८/११/२००९ रोजी झालेल्या बांधकाम समितीतील ठराव क्र. ५ अन्वये शिफारस स्विकारण्यात येऊन मान्यता देण्यात आली.** |

| | |
|---|---|
| **विषय क्र. [ २० (६) ]** | **दि.१० सप्टेंबर, २००९ रोजीच्या व्यवस्थापन परिषदेच्या सभेतील ठराव क्र. ०२ नुसार माजी कुलसचिव डॉ. पी. बी. कुंभार यांच्याबाबतचा अहवाल माहितीस्तव.** |

(सोबत अहवाल जोडला आहे)

(टिपणीः माजी कुलसचिव डॉ. पी. बी. कुंभार यांना तत्कालीन कुलगुरु यांनी दि.१३ ऑगस्ट, २००७ रोजी निलंबित केलेले होते. त्यांच्याबाबतीत आतापर्यंत कार्यालयाने केलेल्या कार्यवाहीचा अहवाल व्यवस्थापन परिषदेच्या माहितीस्तव सादर).

| | |
|---|---|
| **ठराव क्र. २०(६)** | **महाराष्ट्र शासनाचे महाअधिवक्ता (ॲडव्होकेट जनरल) यांच्याकडून कायदेशीर मत घेऊन पुनश्चः प्रकरण सादर करावे असे ठरले.** |

| | |
|---|---|
| **विषय क्र. [ २० (७) ]** | **सोलापूर विद्यापीठास केंद्रीय विद्यापीठाचा दर्जा मिळण्यासाठीचा प्रस्ताव व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ.** |

(टिपणीः सोलापूर विद्यापीठाचे कार्यक्षेत्र सोलापूर जिल्ह्यापुरतेच मर्यादित आहे. विद्यापीठाकडे सध्या ५०० एकर जागा आहे. विद्यापीठाची निर्मिती महाराष्ट्र विद्यापीठे कायदा १९९४ या कायद्यानुसार झालेली आहे.

केंद्रीय विद्यापीठाचा दर्जा या विद्यापीठास मिळाल्यास एक नामांकित व आदर्श केंद्रीय विद्यापीठ म्हणून सोलापूर विद्यापीठ सोलापूर भविष्यात राज्यातच नव्हे तर भारतात ओळखले जाईल.

सबब, या विद्यापीठास केंद्रीय विद्यापीठाचा दर्जा मिळण्यासाठीचा प्रस्ताव विचारार्थ सादर).

| | |
|---|---|
| **ठराव क्र. २०(७)** | **सोलापूर विद्यापीठास केंद्रीय विद्यापीठाचा दर्जा मिळण्यासाठीच्या प्रस्तावास मान्यता देण्यात आली.** |

| विषय क्र. [ २० (८) ] | **अभियांत्रिकी विद्याशाखेचे अधिष्ठाता तथा व्यवस्थापन परिषदेचे सदस्य प्रा. बी. पी. रोंगे यांचे पत्र व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ.** |
|---|---|

(सोबत प्रा.बी. पी. रोंगे यांचे पत्र जोडले आहे)

(टिपणी: अभियांत्रिकी विद्याशाखेचे अधिष्ठाता तथा व्यवस्थापन परिषदेचे सदस्य प्रा. बी. पी. रोंगे यांनी सोबतच्या पत्रामध्ये खालील तीन मुद्दे व्यवस्थापन परिषदेसमोर विचारार्थ सादर करावे अशी विनंती केली आहे.

1) About Examination fee for the students getting positive result after Grievance Redressal (Revaluation)
2) About adding member on Sub-Committee for Recommending T.A. & D.A.
3) About fees for permanent affiliation of courses in the college having permanent affiliation.

उपरोक्त तीन मुद्दे व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ सादर).

| ठराव क्र. २०(८) | **मुद्दा क्रमांक १ बाबत पुढील बैठकीत विषय सादर करावा असे ठरले.**<br>**मुद्दा क्रमांक २ बाबत सदर समितीमध्ये प्रा. व्ही. तिरुपती ऐवजी डॉ. ए. एन. बारबोले यांचे नामनिर्देशन करण्यात आले.**<br>**मुद्दा क्रमांक ३ बाबत सदरचा प्रस्ताव विद्यापीठस्तरीय शुल्क समितीकडे वर्ग करावा असे ठरले.** |
|---|---|

मा.कुलगुरु यांच्या परवानगीने सभा संपल्याचे मा.कुलसचिव यांनी जाहीर केले.

| **सही/-**<br>**कॅप्टन डॉ. एन. पी. सोनजे**<br>**सचिव**<br>**व्यवस्थापन परिषद** | **सही/-**<br>**डॉ. बी. पी. बंडगर**<br>**अध्यक्ष**<br>**व्यवस्थापन परिषद** |
|---|---|